राज्यातील एकात्मीक वाहतूकीचे व्यवस्थापन, समन्वय, नियोजन, सनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक [महामार्ग सुरक्षा पथक ] या पदाची श्रेणीवाढ करून विशेष पोलीस महानिरीक्षक [वाहतूक] पद निर्माण करणे

महाराष्ट्र शासन

गृहविभाग,

निर्णय क्रमांक :- टिआरएस/११९३/२४/पोल-८,
मंत्रालय, मुंबई ४०००३२,
दिनांक ०७ डिसेंबर १९९३

वाचा :- १] शासन निर्णय, गृह विभाग क्र. टिआरए/१५९१/७/पोल-८, दिनांक १३ जून १९९२
२] पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्र. पो.म.सं. २५/४७/म.वा.ग.पो/९३, दिनांक २३/११/१९९३

शासन निर्णय :- राज्यातील राष्ट्रीय महामार्गावर व राज्य महामार्गावर वाहतूक नियंत्रणाचे काम यशस्वीपणे पार पाडण्याकरीता राज्य शासनाने २९ ठिकाणी महामार्गावर वाहतूक मदत केंद्रे स्थापन केलेली आहे. सदर वाहतूक मदत केंद्रातील पोलीस कर्मचारी वाहतूक नियंत्रणाबाबतची स्थिर कामे करीत असल्यामुळे त्यांना महामार्गावर गस्त घालणे शक्य होत नाही. परिणामी राष्ट्रीय व राज्य महामार्गावर प्रवाशांचे खून. दरोडे, चोऱ्या, लूटमार यांचे प्रमाण वाढत आहे. त्याचप्रमाणे अलीकडे दहशतवादी व अतिरेकी कारवाया सुध्दा वाढल्या आहेत. या गुन्हयांना परिणामकारक प्रतिबंध करण्यासाठी शासनाने दिनांक २२/०६/१९९२ चे शासन निर्णयान्वये राज्यात ''महामार्ग सुरक्षा गस्त योजना'' स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने पोलीस उप महानिरीक्षक (महामार्ग सुरक्षा गस्त पथक) असे पद निर्माण केले आहे. तथापि राज्यातील वाहतूकीचे प्रश्न हाताळण्यासाठी सध्या उपलब्ध असलेल्या निरनिराळया यंत्रणा आहेत, परंतू या सर्व यंत्रणांचा समन्वय साधण्यासाठी राज्यात कोणतीही उच्च स्तरावर यंत्रणा नाही. त्याचप्रमाणे वाढते अपघात, दरोडे, शहरीकरण या प्रश्नामुळे एकात्मिक वाहतूकीचे व्यवस्थापन, नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी शास्त्रीय दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे. तसेच महामार्ग वाहतूक मदत केंद्र, महामार्ग सुरक्षा गस्त योजना आणि वाहतूक अभियांत्रिकी पथक यांच्या सविस्तर कामांची माहिती विचारात घेता आणि राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावर होणाऱ्या अतिरेकी कारवाया, दहशतवादांच्या हालचाली, वाहनांची वाढत्या प्रमाणात होणारी वाहतूक व त्यायोगे घडणारे प्राणघातक अपघात आणि हत्यारे, स्फोटके इ. प्राणघातक साधन सामुग्रीची होणारी चोरटी वाहतूक विचारात

घेता, सदरहू महामार्ग वाहतूक केंद्रामध्ये व इतर शाखेमध्ये काम करणाऱ्या विविध पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्या कामकाजावर राज्यात उच्चस्तरीय अधिकाऱ्याने प्रभावीपणे समन्वय व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून राज्य स्तरावर सदरहू कामकाजाकरीता विशेष पोलीस महानिरीक्षकाचे एक नवीन पद निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन होता

२. वरिल सर्व बाबी विचारात घेऊन राज्यातील वाहतूक शाखेच्या कामकाजावर प्रशासकीय दृष्टीकोनातून परिणामकारक समन्वय ठेवण्यासाठी सध्या पोलीस महासंचालकांच्या कार्यालयात असलेले पोलीस उप महानिरीक्षक ( महामार्ग सुरक्षा गस्त पथक ) वेतनश्रेणी ५१००-१५०-५४००-१५०-६१५०/- हे पद रूपये ५९००-२००-६७००/- या वेतनश्रेणीत विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) म्हणून श्रेणीवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

३. पोलीस उप महानिरीक्षक ( महामार्ग सुरक्षा गस्त पथक ) यांचे नियंत्रणाखाली असलेला कर्मचारी आणि साधन सामुग्री, वाहन इ. नव्याने श्रेणीवाढ केलेल्या विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) यांच्या नियंत्रणाखाली राहिल. तसेच बृहन्मुंबई येथिल अपर पोलीस आयुक्त (वाहतूक) यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या वाहतूक शाखेतील कर्मचाऱ्यांची आवश्यक वाटल्यास मदत घेता येईल. त्याचप्रमाणे या पदाचे कार्यक्षेत्र हे राज्य स्तरावर असल्यामुळे त्यांचे मुख्यालय पोलीस महासंचालक यांच्या कार्यालयात, मुंबई येथे ठेवण्यात येऊन ते पोलीस महासंचालक यांचे मार्गदर्शन आणि नियंत्रणाखाली कामकाज करतील. सदरहू विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) यांचेकडे संपूर्ण राज्यातील वाहतूकीबद्दल समन्वय साधण्याचे काम राहिल व त्या शिवाय बृहन्मुंबई वगळता वाहतूकीचे इतर खालीलप्रमाणे कामकाज सोपविण्यात येत आहेत.

१] संपुर्ण राज्यातील एकात्मीक वाहतुकीचे व्यवस्थापन, समन्वय, नियोजन, नियंत्रण व अंमलबजावणी करण्याचे धोरण निश्चित करणे व त्यानुसार वाहतुक समस्येसंबंधी विविध स्तरावर मार्गदर्शन करणे.

२] विविध राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील होणारे प्राणघातक अपघात टाळण्यासाठी आवश्यक ते परिणामकारक योजना करणे, त्याची अंमलबजावणी संबंधीत शासकीय विभागांकडून करण्याबाबत पाठपुरावा करणे.

३] राज्यातील वाहतुक संबंधी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषदा, महानगरपालीका, सिडको, मुंबई क्षेत्र विकास प्राधिकरण इ. विभाग, स्वायत्त संस्थांशी वेळोवेळी विचारविनिमय करून समन्वय राखणे.

४] वाहतुक समस्येविषयी शासनास वेळोवेळी आवश्यक ती माहिती व आकडेवारी उपलब्ध करून देणे, व आवश्यक तेथे सल्ला व मार्गदर्शन करणे.

५] पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना वाहतुक नियंत्रण करण्यासाठी, वाहतुकीची देखरेख, व्यवस्था आणि समन्वय साधण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे.

६] सध्या आस्तित्वात असलेल्या वाहतुक नियंत्रण व्यवस्थेवर देखरेख ठेवणे आणि मुंबई शहर सोडून इतर महानगरातील वाहतुक व्यवस्था सुधारण्याबाबत उपाययोजना सुचविणे.

४. या श्रेणीवाढ केलेल्या पदाची मुदत प्रथमत: दि. २८.०२.१९९४ पर्यंत राहिल. यावर होणार खर्च ''२०५५ - पोलीस - ००१ संचालन व प्रशासन - पोलीस निरीक्षणालय'' या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन १९९३ - ९४ मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. पीएसएफ/५१२४, दि. २३.११.१९९३ अन्वये व त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही /-
( ना.गो. काकड )
उप सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

-----------------

प्रति,
मा. राज्यपालाचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
मा. राज्यमंत्री (गृह) (श्री. ठाकरे) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (गृह) (श्री. किन्हाळकर) यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिवाचे स्वीय सहाय्यक
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व पोलीस आयुक्त
पोलीस उप महानिरीक्षक (महामार्ग सुरक्षा पथक), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय पोलीस उप महानिरीक्षक
सर्व पोलीस अधिक्षक
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
लेखा अधिकारी, मपोसे - सेल, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग व्यय - ७/सार्वजनिक बांधकाम विभाग / नगरविकास विभाग / ग्रामविकास विभाग
सर्व सह सचिव / उप सचिव ( गृह विभाग )
सर्व कार्यासने